लोकमत दिनांक :- १७/०७/२०२१

# प्रवाशांना लुटणारी टोळी अटकेत

## ऑटोत केली जात होती चोरी; वजिराबाद डीबीची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : शहरात ऑटोतून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या खिशातील रक्कम, मोबाइल लंपास करण्याच्या घटनांमध्ये गेल्या काही दिवसांत वाढ झाली होती. वजिराबादच्या डीबी पथकाने अशा प्रकारे चोऱ्या करणाऱ्या टोळीला पकडले असून त्यांच्याकडून १ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पायी जात असलेल्या नागरिकांना बोलण्यात अडकवून ऑटोत बसविल्यानंतर त्यांच्या खिशातील मोबाइल आणि रोख रक्कम लंपास करण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या. या प्रकरणात पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे पो.उप.नि. प्रवीण आगलावे, पो.हे.कॉ. दत्तराम जाधव, गजानन किडे, मनोज परदेशी, पो.कॉ. चंद्रकांत बिरादार, संतोष बेलूरोड, शरदचंद्र चावरे, व्यंकट गंगुलवार, बालाजी कदम आणि शेख इम्रान यांच्या पथकाने खबऱ्याकडून माहिती मिळविली. या माहितीच्या आधारे १७ जुलै रोजी बाफना ते हिंगोली रस्त्यावर एका प्रवाशाला जबरदस्तीने ऑटोत बसवून त्याचा मोबाइल लंपास केल्याची माहिती मिळाली. या प्रकरणात दीपक बालाजी लुंगारे (रा. कंधार) यांनी लगेच पोलिसांना ही माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन ऑटोचालक मजहरखान फारुखान (रा. मिल्लतनगर), मोहम्मद शाहरुख मोहम्मद सलाउद्दीन (रा. खडकपुरा), सय्यद आरेफ सय्यद अली (रा. कंधार) आणि शेख मुबीन शेख मदार (रा. गुलशन कॉलनी) यांना अटक केली. चोरट्यांनी लगेच लुंगारे यांचा मोबाइल काढून दिला. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली ऑटो आणि मोबाइल जप्त केला. विशेष म्हणजे १० जुलै रोजी डीबी पथकाने चोरट्याला पकडून १८ मोबाइल जप्त केले होते.

### ओळख काढून बसवायचे ऑटोत

- पायी जात असलेल्या नागरिकांना ऑटोचालक गावाची किंवा इतर ओळख काढून ऑटोत बसवीत होते. तुम्ही ज्या दिशेला निघाले त्याच दिशेला ऑटो जात असल्याचे आणि पैसेही न देण्याचे पटवून देण्यात येत होते. त्यापूर्वीच ऑटोत तिघे जण बसलेले असायचे. दाटीवाटीने बसल्यानंतर तिघे आरोपी मोबाइल आणि रोख रक्कम काढून घेत होते. अशा रितीने या आरोपींनी अनेकांना लुबाडले आहे.

### शाहरुख खानकडून नऊ मोबाइल जप्त

- १७ जुलै रोजी वजिराबाद ठाण्याच्या डीबी पथकाने रेल्वे स्टेशन परिसरातून शाहरुख खान अली शेरखान याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याच्याकडे चोरीतील नऊ मोबाइल आढळून आले. पोलिसांनी ते जप्त केले.